## वार्षिक अहवाल : एप्रिल २०१७ ते मार्च २०१८

दिनांक ११/०३/२०१८ ला आपली  मागील वार्षिक सर्वसाधारण सभा झाली होती. त्या सभेत आर्थिक वर्षाचा अहवाल द्यावा असे ठरले.त्याप्रमाणे अहवाल सदर करीत आहोत.

## नूतन शिशु मंदिर (पूर्व प्राथमिक विभाग) :

२ मे २०१७ ते १२ मे २०१७ या कालावधीत झालेल्या विद्याभारतीच्या प्रशिक्षण वर्गास आपल्या शाळेच्या सौ.प्राचीताई केळकर व सौ. युक्ताताई मोरे प्रशिक्षक म्हणून उपस्थीत होत्या . तसेच ९ मे २०१७ ते १२ मे २०१७ या कालावधीत प्रभात वर्गासाठी वर्षभर कशाप्रकारे अभ्यासक्रम घेण्यात यावा यासाठी मार्गदर्शन करण्यात आले,त्यावेळी आपल्या शाळेतील सर्व शिक्षिका उपस्थीत होत्या.

दरवर्षीप्रमाणे १३ जून २०१७ सकाळी १० ते १२ दरम्यान होम-हवन करून प्रथमदिनोत्सव साजरा करण्यात आला.पेढे वाटून मुलांचे व पालकांचे स्वागत करण्यात आले.संस्थाचालकांच्या हस्ते मुलांना पिशव्या (दप्तर ) व डब्यांचे वाटप करण्यात आले.२०१७-१८ या वर्षात नवीन प्रवेश घेतलेल्या मुलांना स्टीलचा डबादेण्यात आला.

२०१७-१८ या वर्षात ६ आचार्या व ३ मावश्या कार्यरत आहेत.मुलांना शनिवार रविवार सुटी असून शिक्षक ९ ते १२ या कालावधीत शनिवारी शाळेत उपस्थीत असतात.या वर्षी प्रभात वर्गात प्रवेश घेणाऱ्या मुलांचा विद्यारंभ संस्कार २७ जुलै ,नागपंचमी या दिवशी घेण्यात आला.

आतापर्यंत झालेले सर्व हिंदू सण पारंपरिक पद्धतीने साजरे करून आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना व पालकांना करून दिली गेली.दर महिन्याच्या पौर्णिमेला होम करून त्या त्या महिन्यातील मुलांचे वाढदिवस एकत्रीत साजरे केले गेले.दर महिन्याला पालक सभा घेऊन मुलांच्या संगोपानाविषयी व प्रगतीविषयी माहिती दिली.या वर्षी ‘आतुरालय’ या संस्थेतर्फे ‘बालक पालक सुसंवाद’ या विषयावर पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

१३ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत बालदिन सप्ताहाचे आयोजन करून मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध खेळ व कार्यक्रम घेतले गेले.

२२ डिसेंबर रोजी अरुण व उदय वर्गासाठी भातुकली खेळआयोजित केला होता. तसेच प्रभात वर्गासाठी निवासी वर्गही त्याच दिवशी आयोजित केला होता.यामध्ये मुलांना जीवनोपयोगी कामांची माहिती दिली गेली.

मार्च २०१८ मध्ये होळी हा सण साजरा केला. ३१ मार्च रोजी कौतुक समारंभ झाला. त्यात अरुण, उदय, प्रभात या वर्गाप्रमाणे विद्यार्थांना उपयुक्त अशा चित्र असलेले पुस्तक भेट म्हणून दिले.

## बैरामजी जीजीभॉय प्राथमिक विभाग :

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये दि. २३ आणि २४ जूनला विद्याभारतीतर्फे प्राथमिकच्या सर्व शिक्षकांसाठी भाषा व गणित हे विषय कसे शिकवावेत ह्यासाठी श्री.भाई उपाले व सौ. भावनाताई गवळी यांनी कृतीसत्र घेतले. त्यानुसार इ. १ लीच्या वाचन प्रकल्पाला सुरुवात झाली आहे.

'मराठी शाळा बंद पडण्याची कारणे' या विषयावर माजी विद्यार्थी श्री.समीर गोतारणे व त्यांचे सहकारी यांनी एक लघुपट तयार करण्यासाठी शाळेतील आषाढी एकादशीच्या कार्यक्रमाचे चित्रीकरण केले, तसेच शाळेमध्ये जे अभिनव उपक्रम राबविले जातात त्याविषयी शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या.

१ ते ७ जुलै वृक्ष संवर्धन सप्ताहानिमित्त 'बँक ऑफ इंडिया' तर्फे शिक्षकांना व मुलांना २०० रोपांचे वाटप करण्यात आले .मुलांनी आपल्या घराजवळच्या मोकळ्या जागी वृक्षारोपण करून त्याचा अहवाल आपापल्या वर्गशिक्षकांकडे सादर केला.

'प्रगत महाराष्ट्र' कार्यक्रमांतर्गत ४ ऑगस्ट रोजी शिक्षण निरीक्षिका श्रीमती माधुरी महाजन यांनी शाळेला भेट देऊन मूल्यमापन निकषांची पडताळणी केली.

सकाळ पेपर्स उपक्रमांतर्गत दि.२३ सप्टेंबर रोजी विद्यार्थी व पालकांसाठी लैंगिक अत्याचारावर आधारित 'चांगला व वाईट स्पर्श' याविषयावर पोलिसांतर्फे  कार्यशाळा घेण्यात आली.

दि.१५ नोव्हेंबर रोजी इ.३री व ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी दंतचिकित्सा शिबीर आयोजित करण्यात आले.

राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या,पुण्यतिथ्या,त्याचप्रमाणे वर्षभरात येणारे पारंपरिक सण यानिमित्त कथाकथन ,स्तोत्रपठण गीतगायन स्पर्धा, उजळणी पठण स्पर्धा, रांगोळी काढणे, कंदील बनवणे इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या.यशस्वी विद्यार्थ्यांचे बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले.

शालेय स्पर्धांप्रमाणेचबहिःशालेय स्पर्धांमधेही विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला.

१६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ४ ते ७ या वेळेत इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन जल्लोषात पार पडले. 'भारतभूचे गाऊ गौरवगान, वाढवू देशाची शान' हा स्नेहसंमेलनाचा विषय होता व यात शाळेतील सर्व विद्यार्थांनी भाग घेतला.

२६ फेब्रुवारी रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथीनिमित्त पाढे पठण स्पर्धा घेण्यात आली.

२ मार्च रोजी होळी व धुलीवंदन शाळेत साजरे करण्यात आले. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंगांनी धुळवडीचा आनंद घेतला. सर्वांना पुरणपोळी वाटण्यात आली.

१६ मार्च रोजी गुढीपाडव्यानिमित्त मुलांना या सणाची माहिती सांगण्यात आली. त्यानिमित्त सर्वांना कडुनिंबाचे पान आणि लाडू यांचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासेतर कलागुणांचे कौतुक व गुणगौरव करण्यासाठी वार्षिक बक्षीस समारंभाचे आयोजन २४ मार्च रोजी करण्यात आले. या समारंभाला कवयित्री व कादंबरीकार मधुवंती सप्रे या प्रमुखपाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

## सन्मित्र मंडळ विद्यामंदिर (माध्यमिक विभाग):

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात दि.१५ जून रोजी झाली.

दि.१७ जून रोजी 'ब्रम्हकुमारी' संस्थेतर्फे आलेल्या श्री.प्रमोद व श्रीमती लीना यांनी विद्यार्थ्यांना एकाग्रतेचे महत्व समजावून सांगितले.२१ जून 'जागतिक योगदिनानिमित्त' डॉ.सतीश वझे यांनी विद्यार्थांना योगाचे महत्व सांगितले तसेच मुलांकडून योगासनांची प्रात्याक्षिके करवून घेतली.

गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून अ.भि. गोरेगावकर शाळेच्या शिक्षिका सौ. सिनकर मॅडम उपस्थीत होत्या.

मार्च२०१७मध्येझालेल्याशालांतपरीक्षेमध्येशाळेचाएकूणनिकाल९७.६१% लागला. कु. चैत्रालीजाधवहीविद्यार्थिनी९८% गुणमिळवूनशाळेतप्रथमआली.एकूण९विद्यार्थ्यांना९०% हूनअधिकगुणमिळाले. शालांत परीक्षेत उत्तम यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचे कौतूक करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आरे दुग्धविकास संस्थेचे माजी प्राचार्य मा. श्री. रत्नाकर अहिरे उपस्थित होते.

दि.३१ जुलै रोजी ५वी ते ७वी विज्ञान मंडळ उपक्रमाचे उद्घाटन श्री.कामत सर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी मुलांना वैज्ञानिक संशोधनाचे महत्व व त्याचा देशाच्या प्रगतीसाठी होणारा फायदा याबाबत मार्गदर्शन केले.

दि.५ ऑगस्ट रोजी इ.८वी ते १०वी च्या मुलांना मोबाईलचा सुरक्षित वापर व ऑनलाईन ची वाढती गुन्हेगारी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेच्या प्रथेप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. या वर्षी शाळेच्या ग्रंथपाल श्रीमती चंद्रात्रे बाई डिसेंबर मधे सेवानिवृत्त होत असल्यामुळे १५ ऑगस्टला त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.दरवर्षीप्रमाणे सर्व विभागाच्या मुलांनी व शिक्षकांनी देशभक्तीपर गीते सादर केली.मा.मुख्याध्यापकांच्या भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या वर्षी ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या दिवशी अनंत चतुर्दशीची सुटी असल्याकारणाने शिक्षक दिनाचा कार्यक्रम ६ सप्टेंबर ला विभूती पूजन करून साजरा करण्यात आला.

दि.१५ सप्टेंबर रोजी 'फूटबॉल मिशन वन मिलीयन' उपक्रमांतर्गत दोन्ही अधिवेशनासाठी फूटबॉलचे सामने शाळेच्या पटांगणात आयोजित केले होते.सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी त्यात आनंदाने सहभागी झाल्या.

दरवर्षीप्रमाणे शाळेत महाकवी कालीदास दिन, हिंदी भाषा दिन तसेच राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या,पुण्यतिथी,गुरुपौर्णिमा यानिमित्ताने विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्याचप्रमाणे दिनमहात्म्य मुलांना सांगण्यात आले.

या वर्षी शाळेची शैक्षणिक सहल दि.२१ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीत जळगाव , औरंगाबाद, वेरूळ अजिंठा लेणी येथे आयोजितकरण्यात आली होती.इ.६वीते१०वीच्यावर्गातूनएकूण८५विद्यार्थीसहलीतसहभागीझाले.

दि.२६ डिसेंबर ते २९ डिसेंबर दरम्यान वार्षिक क्रीडामहोत्सव आयोजित करण्यात आला होता.त्यातीलएकदिवससांघिकखेळपांडुरंगवाडीच्यामैदानावरखेळलेगेले.विजेत्या खेळाडूंचे बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले.

दि. १० मार्च रोजी विद्याभारतीतर्फे इ. ८ वी व ९ वीच्या पालकांसाठी प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यात पालक बहुसंख्येने उपस्थीत होते.

### मंडळाचे उपक्रम:

२००७ पासून सुरु करण्यात आलेला इंग्रजी संभाषण वर्ग इ.३री ते ८वी साठी राबवला जातो.मराठी माध्यमाची मुले इंग्रजी विषयात मागे राहू नयेत यासाठी हा उपक्रम राबवला जातो.या वर्षी एकूण १६ शिक्षिका या उपक्रमांतर्गत इंग्रजी शिकवत आहेत.इ.७वीची मुले या उपक्रमांतर्गत ब्रिटीश कौन्सिल संस्थेची परीक्षा देतात.विद्यार्थ्यांना ब्रिटीश कौन्सिल तर्फे सर्टिफिकेट दिले जाते.

इ.५वी ते ७वीच्या मुलांच्या गणिताच्या संकल्पना स्पष्ट व्हाव्यात व गणित विषयाचा पाया पक्का व्हावा यासाठी प.बा.सामंत शिक्षणसमृद्धी प्रयास व नवनिर्मिती लर्निंग फाउंडेशन या संस्थेने विकसित केलेल्या तीन वर्षाच्या प्रकल्पाचे यंदाचे शेवटचे वर्ष असून वर्षभरात होणाऱ्या एकूण ६ कार्यशाळांना आपल्या शाळेतील गणित विषयाचे शिक्षक उपस्थीत राहिले. सहा शाळा सहभागी असलेल्या या उपक्रमाला भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडकडून सुमारे २८ लाखाचे अर्थसाहाय्य मिळाले आहे.

इ.५वीच्या वर्गातील अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी ‘हेल्पिंग हॅन्डस्’ या संस्थेतर्फे ‘EACH ONE-TEACH ONE’ हा उपक्रम राबवला गेला.शाळेचे काही माजी विद्यार्थी व त्यांचे मित्र यांनी आठवड्यातून २-३ दिवस शाळा सुटल्यावर मुलांना शाळेत थांबवून त्यांचागणित, मराठी व इंग्रजी या विषयांचा अभ्यास घेतला.या उपक्रमाचे हे तिसरे वर्ष असून५वी , ६वी,७वीचेविद्यार्थीत्यातसहभागीहोतात.

‘सेव्हदचिल्ड्रन’ संस्थेतर्फेही असाच एक उपक्रम आपल्या शाळेत राबवला जातो.त्यांचे काही शिक्षक येऊन २रीते५वीच्या अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांना वेगळे बसवून शिकवतात.त्यामुळे अभ्यासात मागे असलेल्या मुलांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.प्रत्येकी१.३०तासाच्या४तासिकायेथेदररोज घेतल्याजातात.

सन्मित्र मंडळ माजी विद्यार्थी संघातर्फे शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये इयत्ता पाचवी च्या वर्गासाठी 'गंमतीचा तास' हा उपक्रम राबविला जात आहे. आपल्या शाळेतील माजी विद्यार्थी तसेच शाळेशी संबंधित नसलेले असे सोळा कार्यकर्ते दर शनिवारी एक तास ह्या गंमतीच्या तासात अप्रत्यक्ष शिक्षण पद्धतीचा वापर करीत विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. एक तास विद्यार्थी जास्त थांबत असल्याने त्यांना चविष्ट खाऊही दिला जातो. बहुतेक सगळ्या कार्यकर्त्यांनी Remedial Teaching चे प्रशिक्षण घेतले आहे.

ह्या उपक्रमामागे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास तसेच एकाग्रता वाढविणे, त्यांची अभ्यास आणि शाळेविषयी आवड वाढविणे असे विविध उद्देश आहेत. असे असले तरी विद्यार्थ्यांना आवडतील अशा पद्धतीने - कधी गाणी, गोष्टी, चित्रं, मातीकाम, वादविवाद, कविता पठण, नाटिका, गप्पा, खेळ अश्या विविध माध्यमातून हसत खेळत त्यांच्याशी संवाद साधला जातो. विद्यार्थ्यांचे गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन दिले जाते.

हा गंमतीचा तास विद्यार्थ्यांना एवढा आवडू लागलाय की विद्यार्थी सुट्टीच्या दिवशी देखिल हा तास घेतला तरी उड्या मारत ह्या वर्गाला हजर असतात. दिवाळीच्या सुट्टीत घेतल्या गेलेल्या शिबिरास मिळालेला उत्साह तर खरोखरच बघण्यासारखा होता . त्याचप्रमाणे याही वर्षी माजी विद्यार्थी संघातर्फे शाळेतील व शाळाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी जपानी भाषेचे वर्ग चालवण्यात येत आहेत.

'प्रथम' फाउन्डेशन तर्फे इ.३री ते १०वी च्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येते.या उपक्रमाचेही यंदा २ रे वर्ष आहे.

आपल्याशाळेतसौ. देवतारे बाई अस्थायी तत्वावर गेली ८ वर्षे संस्कृत विषय शिकवीत होत्या . परंतु ऑक्टोबर २०१७ मध्ये शासनातर्फे सौ . तांबे बाई यांची अतिरिक्त कोट्यातून नियुक्ती करण्यात आली.त्यामुळे संस्थेने १५ ऑक्टोबर २०१७ पासून सौ . देवतारे बाई यांना त्यांच्या सेवेची आवश्यकता नाही असे सांगितले . यानिर्णयाविरोधातसौ. देवतारेयांनीशाळान्यायाधिकरण ( स्कूलट्रायब्युनल) यांच्याकडेतक्रारकेलीअसूनसरकारच्या शिक्षण विभागाबरोबरच सन्मित्रमंडळ, माध्यमिकचे मुख्याध्यापक व नवनियुक्त सौ. तांबे बाई यांना प्रतिवादीकेलेआहे . त्याचा प्रतिवाद करण्यासाठी मंडळाने वकील श्री. धोंड यांना नियुक्त केले असून सौ. देवतारे यांचा अर्ज शाळान्यायाधिकरणापुढे प्रलंबित आहे.

आपल्याशाळेच्याग्रंथपालश्रीमतीचंद्रात्रेबाई३०डिसेंबर२०१७रोजीसेवानिवृत्तझाल्या. एकूण१८वर्षग्रंथपालम्हणूनत्यांनीआपलेकामअत्यंतचोखपणेपारपाडले. त्यांचासेवागौरवसमारंभ३०डिसेंबररोजीमंडळातर्फेआयोजितकरण्यातआलाहोता.यापुढेसरकारतर्फेआपल्या शाळेलाग्रंथपालमिळूशकणारनसल्यामुळेशाळेच्याग्रंथालयाचावविद्यार्थी, शिक्षकांचाविचारकरूनमंडळानेत्यांचीपुन्हाअस्थायीस्वरूपीग्रंथपालम्हणूननेमणूककेली आहे.

वाढलेलीविद्यार्थीसंख्या, अपुरीजागाआणिदुसऱ्यामजल्यावरीलपाणीगळतीचात्रासकमीकरण्याच्यादृष्टीने२००४सालीमंडळातर्फे३ऱ्या मजल्यावरअँसबेस्टॉसशीटनेआच्छादितजागेची (माधवसभागृह) निर्मितीकेली. सदर१३वर्षेजुन्याशीट्सनापडलेल्याभेगावत्यामुळेहोणारीपाणीगळतीथांबविण्यासाठीमागीलकाहीवर्षेतात्पुरतीताडपत्रीपूर्णभागावरलावण्यातयेतअसत. परंतुत्यासाठीदरवर्षीहोणारासुमारे७५०००इतकाखर्चलक्षातघेतातसेचपाणीगळतीमुळेहोऊशकणारीइलेक्ट्रिकलशॉर्टसर्किटचीसंभाव्यतालक्षातघेता, कायमस्वरूपी (किमान१०वर्षे) म्हणूनअँसबेस्टॉसशीटऐवजीस्टीलचेपत्रेबसविण्याचानिर्णयमंडळातर्फेघेण्यातआला. सदरकामहेतीनकोटेशन्समागवून M/S राठोडअँन्डराठोडकन्सट्रक्शन्स यांच्यातर्फेमे२०१७च्यासुटीतउपलब्धअसलेल्यावेळेतपूर्णकरण्यातआले. त्यांच्याकडूनअंतिमखर्चाचीरक्कम (देयक) प्रलंबितअसूनयाकामासाठीअंदाजे५.४लाखरुपयेइतकाखर्चअपेक्षितआहे. सदरखर्चामध्ये३ऱ्यामजल्यावरीलपत्रेबद्दलण्याव्यतिरिक्तप्राथमिकविभागाच्याशिक्षकांनाबसण्यासाठीच्या तात्पुरत्याखोलीचीसोय, तसेचइमारतीच्यादक्षिणेकडीलकाहीभागआच्छादितकरण्यासाठीझालेलाखर्चहीसमाविष्टआहे.

बृहन्मुंबईमहानगरपालिकेच्या२०३४च्यासुधारितविकासआराखड्यानुसार ,शाळेच्याउत्तरेकडीलपूर्णमोकळीजागाही, पांडुरंगवाडीवगोगटेवाडीयांनाजोडणाऱ्यारस्त्याच्यारुंदीकरणासाठीघेण्याचेम.न.पाचेप्रस्तावितनियोजनआहे .सदरबाबतीत,माहितीअधिकाराच्याअंतर्गतउपलब्धमाहितीनुसार,सदररस्त्याचेरुंदीकरणहे१३.४मी. ऐवजी९मी. असावे, अशाम.न.पाच्याबैठकीतीलसंमतठरावाचीप्रतमा. मुख्यमंत्र्यांच्यानिदर्शनासआणूनदेण्यातआलेलीआहे. प्रस्तावितरस्तारुंदीकरणातूनविद्यार्थ्यांच्यासुरक्षेसंदर्भातभविष्यातउदभवणाऱ्याप्रश्नांकडेमा.मुख्यमंत्र्यांचे लक्षवेधण्यातआलेआहे.याचसंदर्भातमा. शिक्षणमंत्र्यांकडेसुद्धाविद्यार्थ्यांच्यासुरक्षेच्याप्रश्नाचेगांभीर्यनिवेदीतकरण्यातआलेआहे.प्रशासनाकडूनसद रबाबतीतनिर्णय / उत्तरप्रलंबितअसूनत्याचापाठपुरावाचालूआहे.

आपल्या शाळेला एक्सेल कंपनीच्या सी. एस्. आर्. मधून सुमारे नवू लाखाची मोठी देणगी मिळाली आहे.ही देणगी एक्सेल कंपनी → लायन्स क्लब → माजी विद्यार्थी संघ विशेषतः श्रीमती विशाखाताई कुलकर्णी यांच्या माध्यमातून आपल्या पर्यंत पोहोचली.ह्यातून आपल्याला ९ प्रोजेक्टर्स (त्यातील एक मोठा) ,४ लॅपटॉप ,हेडफोन्स, ई लायब्ररी ,गणित पेटी , ई लर्निंगसॉफ्टवेअर, पाण्याचे पंप मिळाले. त्यामुळे शाळेतील वापरात असलेले पान जुने झालेले सहा प्रोजेक्टर्स आपण बदलले. ई लर्निंग ह्या आपल्या शाळेत गेली ९ वर्षे चालू असलेल्या उपक्रमासाठी, ह्या वर्षी उपलब्ध झालेल्या नवीन कंपनीच्या सॉफ्टवेअरचा उपयोग आगामी शैक्षणिक वर्षापासून करू.

(प्रशांत सु. आठले)

संयुक्त कार्यवाह